# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/02/2023 (बुधवार) सकाळ


## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील दहेगाव शिवार येथे दिनांक २१/०२/२०२३ चे ०७.१० वा. ते ०८.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, दहेगाव शिवार येथे ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या साहाय्याने अवैधरीत्या रेतीची चोरी होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफने घटनास्थळी जावुन न्यु हॉलंड कंपनीच्या ट्रॅक्टरचा चालक व आरोपी याने आपल्या ताब्यातील निळया रंगाचा ट्रॅक्टर मुंडा व निळया रंगाची ट्रॉली मध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने त्यास थांबण्याचा ईशारा केला असता आरोपी चालक ट्रॅक्टर ट्रॉली सोडुन घटनास्थळावरून पसार झाला. आरोपीच्या ताब्यातून १) एक ब्रास रेती किंमती अंदाजे ६०००/— रू. २) एक न्यु हॉलंड कंपनीचा विना नंबरचा निळया रंगाचा ट्रॅक्टर किंमती अंदाजे २,५०,०००/—रू. ३) एक निळया रंगाची विना नंबरची ट्रॉली ५०,०००/—रू. असा एकुण वाहनासह किंमती अंदाजे ३०,६०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— दिपक रेवतकर ब. नं १९८७ पोस्टे खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. खापरखेडा येथे आरोपींविरुध्द कलम ३७९ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक राजु भोयर ब. नं. ९२१ मो. नं. ८३०८५३७८५१ हे करीत आहे.



## चोरी

पो.स्टे. कोंढाळीं :– अंतर्गत १० किमी अंतरावर सोनपुर ता. काटोल येथे दिनांक २०/०२/२०२३ चे १८.३० वा. ते २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– तुशार रामराव कोवे, वय ३५ वर्षे, रा. सोनपुर ता. काटोल यांच्या शेतातील खुल्या जागेत लोंखंडी ताराचे जाळीचे दोन बंडल व एक अर्धा बंडल ठेवलेले होते. त्यापैकी दोन बंडल लोंखडी ताराचे जाळीचे प्रत्येकी किंमती अंदाजे ४०००/– रू असा एकुण ८०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. २०९७ तितरे पोस्टे कोंढाळी मो. नं ७४४७३२८०४६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**